# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं. २६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं. २६४७ १६१९
Email -jtdirrom@gmail.com Website – www.jdteromumbai.com


परिपत्रक

क्र.४/विकामुं/तांशा/अल्पसं/२०१४/ 1971

दिनांक : 25 JUN 2014

प्रति,
सर्व संबंधित विद्यार्थी /प्राचार्य,
मुंबई विभाग

विषय : राज्य शासनाची अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१३-१४
संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे वेब नोटीफिकेशन
क्र. १८/तंशिसं/अल्प.वि./२०१४/१०५, दि. २१/०६/२०१४

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये राज्य शासनाच्या अल्पसंख्याक शिष्यवृत्तीशी निगडीत सर्व संस्थांच्या प्राचार्यांना व विद्यार्थ्यांना सूचित करण्यांत येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या संदर्भीय पत्रामध्ये सूचित केल्यानुसार ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०१३-१४ची शिष्यवृत्ती त्यांच्या खात्यामध्ये जमा झालेली नाही. अशा सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dtemaharashtra.gov.in/scholarships) शिष्यवृत्ती त्यांच्या खात्यामध्ये ज्या कारणास्तव जमा झाली नाही त्या कारणाचे निवारण करुन संस्थेमार्फत दि. ३०/०७/२०१४ पर्यंत आपले बँक खाते/बँक शेऱ्याचा तपशिल ऑनलाईन दुरुस्त करुन घ्यावा. त्याकरिता संदर्भीय पत्रामध्ये ज्या कारणास्तव विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप त्यांच्या खात्यामध्ये जमा झालेली नाही त्याचा चार्ट दिलेला आहे.

सदर पत्रातील शेवटच्या परिच्छेदात दिलेल्या सूचनेनुसार संबंधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन दुरुस्ती केल्यानंतर ऑनलाईन येणाऱ्या रिपोर्ट ची स्कॅन कॉपी दि. ३१/०७/२०१४ पर्यंत अपलोड करावी. त्यानंतर अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या अपडेट केलेल्या खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम परत देण्याची कार्यवाही करण्यांत येईल. **जर त्यांच्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती देता आली नाही, तर त्यांची शिष्यवृत्तीची रक्कम शिष्यवृत्तीचे अर्ज स्विकार करण्यासाठी देण्यात आलेल्या जाहिराती मध्ये नमूद केल्याप्रमाणे रद्द करुन शासनास जमा करण्यांत येईल. त्यानंतर यासंबंधी कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.** याची सर्व संस्थांच्या संबंधीत प्राचार्य व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी. (संदर्भीय पत्राची प्रत माहितीसाठी सोबत जोडण्यांत आली आहे.)

सहपत्र : संदर्भीय पत्राची प्रत

(जी.बी. धनोकार)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी :- २२६१७९६९ फॅक्स : २२६९०००७

E-mail : mcm.dte@gmail.com Internet :http://www.dte.org.in


**Web Notification**

का.क्र.१८/तंशिसं/अल्प.वि/२०१४/ 105

दिनांक : 21.06.14

प्रति,

सर्व संबंधित विद्यार्थी/प्राचार्य,

**विषय :- राज्य शासनाची अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१३-१४**

राज्य शासनाच्या अल्पसंख्याक शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्जामध्ये बँकखाते (Bank Name, IFSC Code, A/c No.) पासबुकची स्कॅन कॉपी अपलोड करुन भरण्यात आले. संस्थेने आपला लॉगिन आयडी व पासवर्ड वापरुन त्या संस्थेमधून विद्यार्थ्यांची अर्जामध्ये भरलेल्या सर्व माहितीची (बँक खाते, नाव इ.) तपासणी करुन अर्ज मंजूर/नामंजूर करण्यात आले.

**या कार्यालयाकडून मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्तीची यादी प्रसिद्ध केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या खात्यामध्ये सन २०१३-१४ साठी मंजूर शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात आलेली आहे.**

ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती देता आली नाही अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी, त्यांच्या **खात्यामध्ये शिष्यवृत्ती न देता आल्याच्या कारणासह** (Bank Remarks) **सांकेतिक स्थळावर** संबंधित संस्थांना त्यांच्या Login Id व्दारे व विद्यार्थ्यांना त्यांच्या Application Id व्दारे दर्शविण्यात आलेले आहे.

| **खात्यामध्ये शिष्यवृत्ती न देता आल्याचे कारण व संस्था / विद्यार्थ्यांकडून करता येणारे निवारण** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **अर्जामध्ये दिलेल्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती न देता आल्याचे कारण** | **संस्था/विद्यार्थ्यांकडून करता येणारे निवारण** |
| 1 | **Non operative A/c no.** | Candidate has to make submitted A/c operative in bank **or** change the A/c & make online updation/confirmation of bank remarks through institute login . |
| 2 | **Incorrect A/c no.** | Candidate has to submit correct A/c no. with copy of passbook to institute & institute has to make online updation/confirmation of bank remarks/Account no. |
| 3 | **Incorrect IFSC Code** | Candidate has to submit correct IFSC Code with copy of passbook to institute & institute has to make online updation/confirmation of bank remarks/IFSC Code. |
| 4 | **A/c Closed** | Candidate has to reopen the submitted a/c in bank **or** submit a new A/c no to the institute with a copy of passbook & institute has to make online updation /confirmation of bank remarks. |
| 5 | A/c no.not allowing to credit the scholarship amout due to **Above Max. balance** | Candidate has to convert the type of the submitted bank A/c into normal saving /current A/c **or** submit a new saving/current A/c no to the institute with a copy of passbook & institute has to make online updation/confirmation of bank remarks. |
| 6 | **A/c is NRI A/c** | Candidate has to submit a new saving/current A/c no to the institute with a copy of passbook & institute has to make online updation/confirmation of bank remarks. |
| 7 | **Minor/Major** Status | If candidate age is below 18 year (Minor) at the time of opening of the bank account and now age is above 18 year (Major) and if still account is Minor in bank than make it Major in Bank. |

ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती त्यांनी जमा केलेल्या खात्यामध्ये थेट देता आली नाही, अशा सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, या कार्यालयाव्दारे सांकेतिक स्थळावर (www.dtemaharashtra.gov.in/scholarships) शिष्यवृत्ती न देता आल्याच्या (दाखविण्यात आलेल्या) कारणाचे निवारण करुन **संस्थेमार्फत ३० जुलै २०१४ पर्यंत** आपले बँक खाते/बँक शेरा **ऑनलाईन दुरुस्त करुन घेणे.**

संस्थांना सर्व विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या लॉगिन आयडी च्या Institute Panel मध्ये Confirmation of scholarship / Updation of bank details देण्यात आलेले आहे. संस्थांनी असे सर्व विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे Confirmation/Updation केल्यानंतर ऑनलाईन येणा-या Report ची स्कॅन कॉपी **३१ जुलै २०१४ पर्यंत** अपलोड करावी, त्यानंतर अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या Update केलेल्या खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम परत देण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल. जर त्यांच्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती देता आली नाही, तर त्यांची शिष्यवृत्तीची रक्कम **या कार्यालयाकडून शिष्यवृत्तीचे अर्ज स्विकार करण्यासाठी देण्यात आलेल्या जाहीराती मध्ये नमूद केल्या प्रमाणे रद्द करुन शासनास जमा करण्यात येईल. त्या नंतर या संबंधातील कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.**

(डॉ.सुभाष महाजन)

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा.,मुंबई.

प्रत: विभागीय कार्यालय, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई, पुणे,नाशिक,नागपूर, औरंगाबाद, अमरावती यांना माहितीसाठी.

आवक क्रमांक : 4297

23 JUN 2014